# परिपत्रक

राज्यात शेती व्यवसाय करतांना होणारे अपघात, वीज पडणे, पूर, सर्पदंश, विंचूदंश, विजेचा शॉक बसणे इ. नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे अपघात, रस्त्यावरील अपघात, वाहन अपघात तसेच अन्य कोणत्याही कारणामुळे होणारे अपघात यामुळे बऱ्याच शेतकऱ्यांचा मृत्यू ओढावतो किंवा काहीना अपंगत्व येते. घरातील कर्त्या व्यक्तिस झालेल्या अपघातामुळे कुटुंबाचे उत्पन्नाचे साधन बंद होऊन अडचणीची परिस्थिती निर्माण होते. अशा अपघातग्रस्त शेतकऱ्यांस / त्यांच्या कुटुंबास आर्थिक लाभ देण्याकरीता शासनाने सन २०१५-१६ पासून **गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना** राज्यात सुरू केली आहे. सन २०१८-१९ मध्ये सदर योजना दि ओरिएन्टल इन्शुरन्स कंपनी लि.पुणे या विमा कंपनीमार्फत राबविण्यात येत असून जायका इन्शुरन्स ब्रोकरेज प्रा. लि. नागपूर ही विमा सल्लागार कंपनी आहे.

**योजनेची ठळक वैशिष्टे :**

१) शेतकऱ्यांनी स्वतः किंवा त्यांच्यावतीने अन्य कोणत्याही संस्थेने ह्या योजनेत पुन्हा स्वतंत्ररित्या विमा हप्त्याची रक्कम भरण्याची गरज नाही. शासनाकडून सर्व खातेदार शेतकऱ्यांचा विमा हप्ता भरण्यात येतो.

२) यापूर्वी शेतकऱ्यांनी अथवा त्यांच्यावतीने अन्य कोणत्याही संस्थेने कोणतीही वेगळी विमा योजना लागू केली असल्यास अथवा विमा उतरवला असल्यास त्याचा या योजनेशी काहीही संबंध राहणार नाही. या विमा योजनेअंतर्गत मिळणारे लाभ स्वतंत्र असतील.

३) योजनेचा लाभ मिळण्यांसाठी विहित केलेली प्रपत्रे/कागदपत्रे वगळता अन्य कोणतीही कागदपत्रे शेतकऱ्यांनी वेगळ्याने सादर करण्याची आवश्यकता नाही.

**गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेअंतर्गत मिळणारे लाभ खालील प्रमाणे राहतील.**

| | **अपघाताची बाब** | **नुकसान भरपाई** |
|---|---|---|
| १) | अपघाती मृत्यू | रुपये २,००,०००/- |
| २) | अपघातामुळे दोन डोळे अथवा दोन अवयव निकामी होणे | रुपये २,००,०००/- |
| ३) | अपघातामुळे एक डोळा व एक अवयव निकामी होणे | रुपये २,००,०००/- |
| ४) | अपघातामुळे एक डोळा अथवा एक अवयव निकामी होणे | रुपये १,००,०००/- |

**लाभार्थी पात्रतेच्या अटी व त्यासाठी आवश्यक कागदपत्रे :**

१) महाराष्ट्र राज्यातील **१० ते ७५** वयोगटातील महसूल नोंदी नुसार असलेला खातेदार शेतकरी.

२) शेतकरी म्हणून त्याचे नावाचा समावेश असलेला **७/१२** किंवा **८-अ** नमुन्यातील उतारा

३) ज्या नोंदीवरुन अपघातग्रस्त शेतकऱ्याचे नाव **७/१२** वर आले असेल अशी सबंधीत फेरफार नोंद (गाव नमुना नंबर **६-ड**)

४) शेतकऱ्यांचे वारस म्हणून गावकामगार तलाठ्याकडील गांव नमुना नं. **६ क** नुसार मंजूर झालेली वारसाची नोंद.

५) अपघाताचे स्वरुपानुसार विहित केलेली इतर कागदपत्रे.

**विमा संरक्षणामध्ये समाविष्ठ बाबी :**

**१)** रस्ता/रेल्वे अपघात **२)** पाण्यात बूडून मृत्यू **३)** जंतूनाशके हाताळतांना अथवा अन्य कारणामुळे विषबाधा **४)** विजेचा धक्का बसल्यामुळे झालेला अपघात. **५)** वीज पडून मृत्यू **६)** खून **७)** उंचावरुन पडून झालेला अपघात **८)** सर्पदंश व विंचुदंश **९)** नक्षलाईटकडून झालेल्या हत्या **१०)** जनावरांच्या खाल्ल्यामुळे / चावण्यामुळे जखमी/ मृत्यू **११)** दंगल **१२)** अन्य कोणतेही अपघात.

**विमा संरक्षणामध्ये समाविष्ठ नसणाऱ्या बाबी :**

**१)** नैसर्गिक मृत्यू **२)** विमा कालावधीपुर्वीचे अपंगत्व **३)** आत्महत्येचा प्रयत्न, आत्महत्या किंवा जाणीवपूर्वक स्वतःला जखमी करुन घेणे **४)** गुन्हयाच्या उद्देशाने कायद्याचे उल्लंघन करतांना झालेला अपघात **५)** अंमली पदार्थाच्या अमलाखाली असतांना झालेला अपघात **६)** भ्रमिष्टपणा **७)** बाळंतपणातील मृत्यू **८)** शरीरातर्गत रक्तस्त्राव **९)** मोटार शर्यतीतील अपघात **१०)** युध्द **११)** सैन्यातील नोकरी **१२)** जवळच्या लाभधारकाकडून खून.

**वारसदार :**

**अ)** मृत शेतकऱ्याची पत्नी/मृत शेतकरी स्त्रीचा पती **ब)** मृत शेतकऱ्याची अविवाहित मुलगी **क)** मृत शेतकऱ्याची आई **ड)** मृत शेतकऱ्याचे मुलगे **ई)** मृत शेतकऱ्याची नातवंडे **फ)** मृत शेतकऱ्याची विवाहित मुलगी.

**विमा प्रस्ताव सादर करण्याची पद्धती :**

शेतकरी/वारसदाराने विमा कालावधीत तालुका कृषि अधिकारी कार्यालयामार्फत परिपूर्ण प्रस्ताव जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयाकडे पाठवावयाचा आहे. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी प्रस्तावांची नोंद घेऊन शासनाचे विमा सल्लागार यांचे विभागीय कार्यालयाकडे पाठवावयाचा आहे. विमा सल्लागार यांचे कार्यालयाकडून प्राथमिक छाननी होऊन तो विमा कंपनीकडे अंतिम मंजुरीसाठी पाठवावयाचा आहे.

सदर प्रयोजनार्थ क्षेत्रीय स्तरावरील सर्व कृषि पर्यवेक्षकांना दावा / विमा प्रस्ताव सादरकर्ता प्रधिकारी म्हणून घोषीत करण्यात आलेले आहे. राज्यातील काही जिल्हयांतील दुर्घटनाग्रस्त शेतक-यांच्या वारसांकडे व विमा प्रस्तावाच्या अनुषंगाने काही मध्यस्थ / दलाल हे वारसदारांशी संपर्क करुन विमा प्रस्ताव मंजूरी / त्रुटी बाबत दिशाभूल करुन फसवणूक करत असल्याचे माझे निदर्शनास आले आहे. ही अत्यंत गंभीर स्वरुपाची बाब आहे. त्या अनुषंगाने यापुढे संबंधित कार्यक्षेत्रातील कृषि पर्यवेक्षक यांनी दुर्घटनाग्रस्त शेतकरी व मृत शेतक-यांचे वारसदार यांचेशी सतत संपर्कात रहावे. विमा प्रस्तावासाठी लागणारी सर्व कागदपत्रांची माहिती वारसदारांना देण्यात यावी. याकरीता लागणारी आवश्यक ती मदत विमा सल्लागार कंपनीच्या जिल्हा प्रतिनिधी यांना करण्याबाबत सूचना देण्यात याव्यात.

कार्यक्षेत्रातील विमा प्रस्तावांची सद्यस्थिती माहिती करुन घेण्याकरीता वारसदार व विमा सल्लागार व विमा कंपनीच्या प्रतिनिधीच्या संपर्कात राहून परिपूर्ण विमा प्रस्ताव मंडळ कृषि अधिकारी यांचेमार्फत तालुका कृषि अधिकारी यांना सादर करावा.विमा कंपनीस सादर केलेल्या विमा प्रस्तावांची सद्यस्थिती जाणून घेण्याकरीता दि ओरिएंन्टल इन्शुरंन्स कंपनी लि. यांचा **टोल फ्री क्रमांक १८००-११८-४८५** असा असून जायका विमा सल्लागार कंपनी यांचा **टोल फ्री क्रमांक १८००-२३३३-५३३** असा आहे. याबरोबरच विमा प्रस्तावांची मंजूर/नामंजूर विमा प्रकरणांची यादी पाहण्या करीता कृषि विभागाच्या संकेतस्थळावर विमा सल्लागार कंपनीची लिंक उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. शेतक-यांची मध्यस्थ / दलालामार्फत फसवणूक होऊ नये म्हणून क्षेत्रिय अधिकारी / कर्मचारी यांनी खरीप / रब्बी हंगामात होणा-या गावसभा / शेतीशाळा / इतर स्थानिक प्रसार माध्यमातून योजनेची प्रचार व प्रसिध्दी करावी. तालुका कृषि अधिकारी / उपविभागीय कृषि अधिकारी / जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व विभागीय कृषि सहसंचालक यांनी योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनूसार जबाबदारी वेळेत पार पाडावी.

दिनांक ४ डिसेंबर,२००९ चे शासन निर्णयान्वये मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात आलेली आहे. तथापि सदर समितीच्या बैठका नियमितपणे दरमहा आयोजीत केल्या जातील याकडे कटाक्षाने लक्ष दयावे.तसेच सदर बैठकांमध्ये प्रलंबित प्रकरणांवर प्राधान्याने विचार विनिमय करुन संबंधित विभाग प्रमुखांना कागदपत्रांच्या पुर्ततेसाठी / उपलब्धतेबाबत सूचना देऊन अपघातग्रस्त कुटुंबांचे विमा प्रस्ताव तात्काळ मंजूर होण्यासाठी आवश्यक ती सर्व मदत करण्यात यावी.

30/7/19

**आयुक्त (कृषि)**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,**
**पुणे-०१**

.....................................................................................................

जा.क्र.कृषिआ/गोमुंशेअवियो १९-२०/परिपत्रक/७९६/१९
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
पुणे-४११ ००१ दिनांक :- ३१ जुलै, २०१९

**प्रति,**

१) विभागीय कृषि सहसंचालक (सर्व)
२) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व)
३) उपविभागीय कृषि अधिकारी (सर्व)
४) तालुका कृषि अधिकारी (सर्व)
५) मंडळ कृषि अधिकारी (सर्व)

प्रत :- माहिती करीता

१) **मा.संचालक (विस्तार व प्रशिक्षण),** कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१
२) **कृषि उपसंचालक, मा.आयुक्त (कृषि) कक्ष,** कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१